नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, अहमदनगर, नांदेड, हिंगोली, मुंबई, ठाणे, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली सांगली, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव या जिल्ह्यात एकाचवेळी प्रकाशित होणारे दैनिक वृत्तपत्र

**आजचा शुभ विचार**

लोक आपल्याबद्दल काय बोलतात, त्याचा विचार करण्यापेक्षा लोक आपल्याबद्दल तसे का बोलतात त्याचा विचार करा

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 2 ▪ ISSUE-143 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 01 January 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष २ ▪ अंक १४३ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार दि. ०१ जानेवारी २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

## बीड सरपंच हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड सीआयडीसमोर शरण!

पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख निर्घृण हत्या प्रकरणातील मोठी बातमी समोर आली आहे. बीड सरपंच हत्येप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड तीन आठवड्यांपासून फरार झाले होते. दरम्यान आज त्यांनी व्हिडिओ शेअर करत पुण्यात सीआयडीसमोर शरण आला आहे मिळालेल्या माहितीनुसार, बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर सर्वत्र एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणात केज पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी पोलिसांकडून शोध सुरु असताना वारंवार वाल्मिक कराड यांचे नाव समोर येत होते. हत्या प्रकरणात संबंध असल्याचा ठपका ठेवण्यात आलेले वाल्मिक कराड तीन आठवड्यांपासून फरार होते. तर आज वाल्मिक कराड स्वत: पुणे सीआयडीकडे शरण गेला आहे. तसेच ते सीआडीच्या गाडीने न जाता स्वत:च्या गाडीने गेले आहेत.

**सरेंडर होण्यापूर्वी दिली प्रतिक्रिया**

'मी वाल्मीक कराड केज पोलीस स्टेशनला खोटी खंडणीची फिर्याद दाखल झालेली आहे. मला अटकपूर्वचा अधिकार असताना मी सीआयडी ऑफिस पुणे पाषाण रोड येथे सरेंडर होत आहे. सरपंच संतोष भैय्या देशमुख यांचे जे कोणी मारेकरी आहे, त्यांना अटक करावी. त्यांना फाशीची शिक्षा व्हावी. केवळ राजकीय द्वेषापोटी या प्रकरणाशी माझे नाव जोडले जात आहे. पोलीस निष्कर्षात मी जर दोषी आढळल्यास न्यायदेवता जे काही शिक्षा देईल ते मी भोगण्यास तयार आहे. अशी प्रतिक्रिया कराड यांनी दिली आहे. दरम्यान, या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर तीन आरोपी फरार झाले आहेत. सध्या फरार आरोपींचा शोध सुरु आहे.

## संतोष देशमुख हत्या प्रकरणी सरपंच संघटनेचे राज्यात ३ दिवस काम बंद आंदोलन

बीड प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. हे हत्या प्रकरण चांगलेच चर्चेत आले आहेत. या घटनेतील काही आरोपीना पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात वाल्मिक कराड हे मास्टरमाइंड असल्याचा आरोप केला जात आहे. शनिवारी (२८) बीडमध्ये संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला होता. आता राज्यभरातील ग्रामपंचायतीचे कामकाज आजपासून तीन दिवस बंद राहणार आहे.


मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाई करावी आणि लोकप्रतिनिधींवर होणाऱ्या हल्ल्यांना आळा बसावा, यासाठी कडक निर्बंध बसवावेत, या मागणीला घेऊन आजपासून सरपंच संघटनेने राज्यभरात काम बंद आंदोलन पुकारलं आहे. या आंदोलनात महाराष्ट्रात एकूण २७, ९५१ ग्रामपंचायती सहभागी होत आहेत.

महाराष्ट्रात ३५१ पंचायत समित्या किंवा ब्लॉक पंचायती आहेत. भंडारा जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात एकूण ७ पंचायत समित्या असून ५४१ ग्रामपंचायती आणि ८६६ गावे आहेत. ग्रामपंचायत हा पंचायत राजमधील सर्वात खालचा पण महत्त्वाचा भाग आहे. ग्रामपंचायतीचे कामकाज पुढील तीन दिवस ठप्प होणार असून याचा फटका नागरिकांना बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेतील फरार असलेल्या आरोपीला लखनौमधून अटक!

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



घाटकोपर येथील पेट्रोल पंपावर सात महिन्यांपूर्वी महाकाय होर्डिंग कोसळले होते. या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाल्याची घटना यावर्षी मे महिन्यात घडली होती. या दुर्घटनेतील आरोपी सात महिन्यांपासून फरार होता. फरार असणाऱ्या अर्षद खान याला अखेर ३० डिसेंबर रोजी उत्तर प्रदेशातील लखनौ येथून अटक करण्यात आली आहे. घाटकोपर होर्डिंग प्रकरणातील व्यवसायिक अर्शद खान याला मुंबई गुन्हे शाखेकडून सात महिन्यांनंतर अटक करण्यात आली. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी अर्शद खान याला सोमवारी लखनऊमध्ये अटक करण्यात आली आहे. या होर्डिंग घटनेशी संबंधित आर्थिक व्यवहार उघड करण्यासाठी त्याची अटक महत्त्वपूर्ण मानली जात आहे. रेल्वेचे माजी पोलीस आयुक्त यांचा निकटवर्तीय म्हणून ओळखला जाणारा अर्षद खान याने दुर्घटनाग्रस्त होर्डिंग कंपनी इगो मीडिया कडून ४६ लाख रुपये घेतले असे तपासात समोर आले होते.तपासनंतर अर्षद खान याला या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले होते. मुंबई पोलिसांनी अर्शद खान याचा सर्वत्र शोध घेतला होता. परंतु तो आतापर्यंत मिळाला नव्हता. अखेर सोमवारी अर्षद खान याला अटक करण्यात आले आहे. अर्षदला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला ६ जानेवारी पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी कंपनीच्या मालकासह चार जणांना पूर्वी अटक झाली होती, अर्षद खान ही पाचवी अटक आहे. घाटकोपर होर्डिंग प्रकरणात यापूर्वी पंतनगर पोलीस ठाण्यात होर्डिंग कंपनी इगो मीडियाचे मालक भावेश भिंडे सह कंपनीच्या माजी संचालक जान्हवी मराठे , होर्डिंगच्या देखभालीची जबाबदारी सांभाळणारे सागर पाटील आणि स्ट्रक्चरल अभियंता मनोज संघू यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान हा गुन्हा मुंबई गुन्हे शाखेकडे वर्ग करून विशेष तपास पथक गठीत करण्यात आले होते. त्यांनतर या प्रकणात विशेष तपास पथकाने भावेश भिंडे कंपनीच्या मालकासह चार जणांना अटक करण्यात आली होती. मुंबईत १३ मे २०२४ रोजी घाटकोपरमधील छेदा नगरातील पेट्रोप पंपावर असलेले मोठे होर्डिंग कोसळले होते. हे अवैध होर्डिंग १५ हजार वर्ग फूटापेक्षा मोठे होते. या होर्डिंगची नोंद लिम्का बुक ऑफ रिकॉर्ड्समध्ये होती. या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला होता. तसेच ७० पेक्षा जास्त जण जखमी झाले होते.

## पुण्यात साजरा होणार भव्य आर्मी डे!

### 3 ते 15 जानेवारी सम्पंन होणार आयोजन केंद्रीय संरक्षण मंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या सह सर्व नेत्यांची लाभणार उपस्थिती

पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



भारतीय सैन्यदलाचा ७७ वा वर्धापन दिन यंदा पुण्यात साजरा होत आहे. यानिमित्त आळंदी रस्त्यावरील बॉम्बे सॅपर्स या लष्करी संस्थेच्या मैदानावर भव्य कार्यक्रम होणार आहे. यानिमित्त ३ ते १५ जानेवारीदरम्यान विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत. भारत देश स्वतंत्र होताच १५ जानेवारी १९४९ रोजी भारतीय लष्कराच्या प्रमुखपदी ले. जन. के. एम. करिअप्पा यांची निवड झाली. तेव्हापासून १५ जानेवारी हा भारतीय लष्कराचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. शहरात १५ जानेवारी रोजी होणार्या कार्यक्रमास संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) अनिल चौहान, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दक्षिण कमांड येथे ३ ते ५ जानेवारीदरम्यान आर्मी मेळ्याचे आयोजन केले आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत प्रवेश खुला राहणार आहे. आळंदी रस्त्यावरील बॉम्बे सॅपर्स या सैन्यदलाच्या मैदानावर लष्कराच्या वतीने संचलनासह अत्याधुनिक शस्त्रांचे विलोभनीय दर्शन होणार आहे. तसेच, लष्कराच्या वतीने मिशन ऑलिम्पिकसारखे सजीव देखावे साकारणारे रथ या ठिकाणी पाहावयास मिळणार आहेत.

## प्राजक्ता माळीच्या तक्रारीनंतर महिला आयोग ॲक्शन मोडमध्ये पोलीस विभागाला दिल्या योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात राज्याचे कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांना लक्ष्य करत असताना अभिनेत्री प्राजक्ता माळी यांचा नामोल्लेख केला होता. परळीत इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्सचा वेगळाच परळी पॅटर्न आहे. याठिकाणी मोठ मोठ्या सेलिब्रिटी येत असल्याचे सांगून धस यांनी काही महिला कलाकारांची नावे घेतली होती. यानंतर अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. हा अर्ज राज्य महिला आयोगाला प्राप्त झाला असून, महिला आयोगाने या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिसांना काही निर्देश दिले आहेत. बीडमधील देशमुख हत्या प्रकरणात सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळीचे नाव घेतले होते. त्यानंतर त्यांच्या वक्तव्याविरुद्ध प्राजक्ता माळीने राज्य महिला योगाकडे तक्रार दाखल केली. तसे तिने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली आहे. त्यानंतर राज्य महिला आयोगाने कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्य महिला आयोगाने मुंबई पोलिसांना वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची सूचना केली आहे. याबाबत राज्य महिला आयोगाने एक्सवर माहिती दिली आहे. त्यामुळे आता आमदार सुरेश धस यांच्यावर कारवाई होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, सुरेश धस यांच्या वक्तव्यानंतर प्राजक्ता माळी हिने पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली होती. तिने सुरेश धस यांच्या वक्तव्याविषयी संताप व्यक्त केला होता. तसेच प्राजक्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सहकुटुंब भेट घेत तक्रारींचा पाढा वाचला आणि निवेदन देखील दिले होते. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी, महिलांच्या सन्मानाला बाधा येईल, असे कुठलेही कृत्य खपवून घेणार नाही आणि त्यावर कारवाई केली जाईल, असे आश्वासन प्राजक्ता माळी आणि तिच्या कुटुंबाला दिले होते.

## अपघात की घातपात?

### समृद्धी महामार्गावर अचानक पंक्चर झाली ५० वाहने

शिर्डी प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



मुंबई ते नागपूर असा ७०१ किलोमीटर लांबीचा असणार समृद्धी महामार्ग सतत या ना त्या कारणाने चर्चेत असतो. आता समृद्धी महामार्गावर दोन दिवसांपूर्वी घडलेला एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. २९ डिसेंबर रोजी समृद्धी महामार्गावर वाशिम जिल्ह्यातील मालेगाव ते वनोजा टोल नाका या दरम्यान एक दोन नव्हे तब्बल ५० वाहने पंक्चर झाल्याची घटना घडली आहे. महामार्गावर पडलेल्या लोखंडी फलकावरून वाहने गेल्याने हा प्रकार घडल्याचे बोलले जात आहे. यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान ही घटना चुकून घडली आहे की कोणी मुद्दाम हा प्रकार केला आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

**प्रवाशी रात्रभर अडकले**

ही घटना २९ डिसेंबर रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास घडली असून, यामुळे ५० हून अधिक वाहने अचानक पंक्चर झाली. यामुळे चारचाकी वाहनांसह आणि मालवाहू वाहनांनाही फटका बसला. तसेच समृद्धी महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. दरम्यान या घटनेनंतर अनेक प्रवाशांना त्यांच्या वाहनाचे पंक्चर काढता न आल्याने ते रात्रभर समृद्धी महामार्गावर अडकले होते.

**अपघात की घातपात?**

हा प्रकार समोर आल्यानंतर स्थानिकांनी याची चौकशी केली असता त्यांना रस्त्यावर एक लोखंडी फलक पडलेला दिसला. तो अपघाताने रस्त्यावर पडल्याचे म्हटले जात आहे. असे असले तरी अनेकांनी तो कोणीतरी मुद्दाम टाकला असावा अशी शंका व्यक्त केली आहे. ही घटना नियोजित होती की अपघात, याचा तपास सुरू आहे.

**समृद्धी महामार्गावर**

**अपघातामुळे २३३ प्रवाशांचा मृत्यू**

मुंबई ते नागपूर असा ७०१ किलोमीटर लांबीचा असलेला समृद्धी महामार्ग अंदाजे ५५ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. या महामार्गामुळे दहा जिल्ह्यांमधील ३९० गावे जोडली गेली आहेत. समृद्धी महामार्गाच्या लोकार्पणाला याच महिन्यात दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. नागपूर ते शिर्डी या ५२० किमी लांबीच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण ११ डिसेंबर २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. या कालावधी महामार्गावरून एक कोटी ५२ लाख वाहने धावली असून यातून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) ११०२ कोटी रुपये महसूल मिळाला. मात्र त्याचवेळी १४० अपघातांमध्ये २३३ प्रवाशांचा मृत्यूही झाला आहे.

नवीन वर्षाचे मंगलमय स्वागत करूया

दैनिक स्वराज्यदूत दिनदर्शिकेने

अधिक माहितीसाठी संपर्क करा तुमच्या नजीकच्या प्रतिनिधी किंवा दैनिकाच्या अधिकृत क्रमांक ८४४६६७३६७७ वर

संपादकीय

# सरकारच्या निष्काळजीपणाचे बळी..?

गेल्या काही दिवसांपासून मुंबईत अशा काही अपघाती घडामोडी घडत आहेत ज्या अनपेक्षित असून मुंबईच्या प्रतिष्ठेलाही शोभत नाहीत. कुर्ला येथील बेस्ट बस अपघात असो वा गेटवे ऑफ इंडियाहून एलिफंटा येथे जाणारी प्रवासी बोट समुद्रात बुडून झालेला अपघात असो, रोज कित्येक जण असेच गाडीखाली येऊन अथवा अपघात होऊन मरत असतात. मात्र हा नशिबाचा भाग होता की, प्रशासकीय निष्काळजीपणाचा भाग होता. ही एक घटना होती म्हणून सर्वजण मृत्यू पडलेल्यांच्या नातेवाईकांना पैशाची मदत करून निर्धास्त होणार की, यातून कोणता धडा घेणार...





मुंबई शहरात नुकतेच कुर्ला येथे भर रहदारीच्या वेळेत बसवरील नियंत्रण सुटून बसचा अपघात झाला. त्यात ९ जण मृत्युमुखी पडले. मुंबईत बेस्टचे थोडे-फार प्रमाणात अपघात होतात; मात्र हा अपघात इतका भीषण अपघात होता की, बसच्या रूपाने साक्षात यमदूतच होता की काय? असा प्रश्न पडतो. यात ५० हून अधिक जण जखमी झाले, कित्येक जणांची स्वप्न उद्ध्वस्त झाली, कित्येक जण कायमचे जायबंदी झाले, कित्येक जणांचे संसार उद्ध्वस्त झाले. यामधून सावरत असतानाच काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससमोर एक बेस्ट अपघात झाला. त्यात एकाला आपले प्राण गमवावे लागले, तर काही दिवसांनी गेटवे ऑफ इंडिया येथून एलिफंटा येथे जाणाऱ्या पर्यटकांच्या बोटीला नौदलाच्या एका नादुरुस्त बोटीने धडक देऊन अपघात झाला. त्यात कित्येक जणांना बुडून जलसमाधी मिळाली, तर कित्येक जण थोडक्यात बचावले, तर या दोन घटनेतून बाहेर पडत असतानाच दोन दिवसांपूर्वी घाटकोपर येथे टेम्पोवाल्याचे नियंत्रण सुटून त्यांनी पाच दुचाकींना धडक दिली त्यात अनेक दुचाकीस्वार व हातगाड्यांचे नुकसान झाले, तर एका महिलेचा मृत्यू झाला आणि अगदी कालचीच ताजी बामी म्हणजे तर मराठी अभिनेत्रीच्या चालकाने भर वेगात गाडी चालवल्याने त्याचा नियंत्रण सुटून ती पोईसर मेट्रोस्थानकाखाली काम करत असलेल्या मजुरांना धडक दिली. त्यात दोन मजूर मृत्युमुखी पडले, तर अभिनेत्री अजूनही इस्पितळात उपचार घेत आहे.

या अशा घटनांमुळे मुंबई शहरातील पादचारी काय आता पर्यटकही सुरक्षित नाहीत असा चुकीचा संदेश सर्वत्र जाऊ शकतो व कालांतराने मुंबईच्या पर्यटनालाही याचा फटका बसू शकतो हे आता लक्षात घेतले पाहिजे. मुंबई शहर हे अपघातांचे शहर असे नावारूपाला येऊ नये हीच इच्छा. एलिफंटा येथे घडलेल्या अपघातात तर पंधरा जणांचा नाहक मृत्यू झाला, तर कित्येक जणांना वाचवण्यात यश आले. मुंबईत पायी चालत निघाले तरी कुठले झाड तर अंगावर कोसळणार नाही किंवा एखादे होल्डिंग तर अंगावर पडणार नाही याचीही भीती घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेनंतर सर्वसामान्यांच्या मनात घर करू लागल्या आहेत, रस्त्यावर चालायला गेले तर कोणते वाहन बेकाबू होऊन आपल्या अंगावर येऊन आपले प्राण तर घेणार नाही अशी भीती सतत पादचाऱ्यांच्या मनात घोंगावत आहे. बाकी दुचाकीवरचे अपघात मुंबईला रोज नवीन नाहीत. व दुचाकीस्वारांच्या चालवण्यावर तर बोलायचीच सोयच राहिलेली नाही. दुचाकीस्वारांच्या स्वैराचारावर बोलण्याचीही कोणती सोय राहिलेली नाही. याचा परिणाम मुंबईच्या जडणघडणीवर उद्योग-धंद्यांवर तसेच पर्यटनावरही होऊ शकतो. अशा बेशिस्तीमुळे मुंबईचे महत्त्व कमी होऊ शकते. आर्थिक नुकसान होईल ते वेगळेच. एलिफंटा येथे जाणाऱ्या नीलकमल बोटीवर आलेले प्रवासी हे तर मुंबईच्या पर्यटन स्थळांचा आनंद घेण्यास आले होते. त्यांत त्यांची काय चूक होती.नौदलाची नादुरुस्त बोट येऊन त्यावर धडकते काय आणि यातील १५ जणांना जलसमाधी मिळते काय सगळेच समजण्यापलीकडील आहे.

मुंबईत आनंद लुटण्यासाठी आलेले ते पर्यटक जीवनातील दोन क्षण वेगळ्या वातावरण घालवायला आले होते. आपल्या मुलांच्या हट्टाखातर त्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी आले होते पण त्यांच्यावर अशा पद्धतीने काळाने घाला घातला. असा काही प्रकार घडण्याची कोणती कल्पना नसताना ही घटना घडली. इतर यंत्रणा तेथे लवकर पोहोचल्यामुळे बोटीतून शेकडो लोकांचे प्राण वाचवण्यात यश आले मात्र १५ जणांना आपला जीव गमवावा लागला. अशा घटनांमुळे मनात भीती उत्पन्न होणे हे स्वाभाविकच आहे. मुंबईत आता त्यामुळे कोणताही प्रवास असुरक्षित राहिलेला नाही.मुंबईची लोकसंख्या आता झपाट्याने वाढत आहे. त्यातच रस्ते कोणतेही करा डांबरी अथवा सिमेंटचे. ते मोठे न होता रुंदच होत आहेत. रस्त्याच्या दुतर्फा गाड्यांचे पार्किंग केले जात आहे. वाहनचालकांना शिस्त राहिलेली नाही. वाहतूक पोलिसांचे कार्य अशा वाहनचालकांना शिस्त लावणे आहे. मात्र त्यांच्या पुढे ही महत्त्वाची गोष्ट नसून अशा प्रकारे एखादा वाहनचालक भेटलाच तर त्याच्याकडून वसुली करणे हेच त्यांचे एकमेव कार्य राहिलेले आहे. दंड गोळा करून वसूल करणे व सरकारी महसुलात भर घालणे. वाहनचालकांना शिस्त लावणे यांचे प्राधान्य कशाला द्यायचे याचे उत्तरच आता त्यांच्याकडून मिळवले पाहिजे. रस्त्यावरील फेरीवाले मुंबईतील फार मोठी समस्या आहे पण त्यावर तोडगा काढला जात नाही. फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी कधीही होऊ शकत नाही हे माहीत असताना केंद्र सरकारने कोट्यावधी रुपयांचे कर्ज त्यांना दिले आहे. ते केवळ त्यांच्या व्यवसायात वाढ व्हावी म्हणून पण त्याचा उलटा परिणाम होतोय. फेरीवाल्यांच्या संघटित दादागिरीसमोर एकटा ग्राहक काहीच करू शकत नाही.पालिकेला न्यायालयाचे आदेश आहेत त्यांनी व पोलिसांनी संयुक्तपणे पदाधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करावी पण आदेश आल्यानंतर थोडे दिवस कारवाई करण्यात येते. मात्र पुन्हा परिस्थिती जैसे थे राहते हे नेहमीचेच झाले आहे.

सध्या पालिकेची फेरीवाल्यांवर कारवाई सुरू आहे. ज्या ठिकाणी कुर्ल्याचा अपघात झाला त्या ठिकाणी पालिकेने अपघातानंतर कारवाई केली तीच आधी कार्यवाही केली असती, तर रस्ता थोडा मोठा झाला असता व अपघातात काही लोकांना आपली बळी द्यावी लागली नसती. हे बळी प्रशासनाचे बेपर्वाईचे बळी तर नव्हेत ना? तीच गोष्ट नीलकमल बोटीला झालेली दुर्घटना.

नीलकमल बोटीची काहीही चूक नसताना नौदलाची नादुरुस्त बोटीत बिघाड झाला होता व ती या नीलकमल बोटीवर आदळली मात्र यात दोष कोणाचा? यातील नीलकमल बोटीचा परवाना रद्द करण्यात आला. कारण काय तर त्याने क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बोटीतून वाहून नेण्याचा गुन्हा केला. मात्र ही गोष्ट उजेडात येण्यास दुर्घटना कारणीभूत ठरली. आता सर्वच बोटींचे परवाने तपासले जाणार व बोटीही नियमानुसार चालणार. प्रवासी अगदी लाईफ जॅकेट घालून बोटीत बसणार ते पुढची दुर्घटना होईपर्यंत...

कुर्ला येथे बेस्ट बस अपघात प्रकरणी सर्वच कंत्राटी बसचालकांची आता तपासणी सुरू होणार . त्या बसचालकांनी किती प्रशिक्षण घेतले आहे त्यात किती गैरव्यवहार झाले आहेत याचाही शोध लावला जाणार. मात्र हे सर्व करण्यास अपघातच घडून आला हे आपल्याच प्रशासकीय यंत्रणेचे दुर्दैव होय. हे कायमचे राहो. नाही तर दुसऱ्या अपघाताची वाट पाहावी लागेल.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# जगन्नाथ कडवादास शाह आदर्श महाविद्यालयाचे प्रा. डॉ.रवींद्र ठाकरे यांचा सेवा निवृत्त समारंभ संपन्न

भावेश ठाकरे
माळमाथा परिसर
जाहिरात प्रतिनिधी

---



ज्या शाळेत जीवनाची अक्षरे गिरवली, त्याच विद्यालयात मला प्राध्यापक होऊन ज्ञानदानाची संधी मिळाली. ही जीवनातील सर्वात अमूल्य गोष्ट आहे. असे प्रतिपादन डॉ. रवींद्र ठाकरे यांनी आपल्या मनोगतातून केले. निजामपूर जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे जगन्नाथ कडवादास शाह आदर्श महाविद्यालयाचे प्रा. डॉ.रवींद्र ठाकरे, मराठी विभाग प्रमुख आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विश्वस्त बारीक पगारे, संस्थेचे शालेय समिती अध्यक्ष अजितचंद्र शाह, संस्थेचे सचिव नितीन कुमार शाह, संस्थेचे खजिनदार प्रदीप वाणी, संस्थेचे विश्वस्त राजेंद्र वाणी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात सुरुवातीला व्यासपीठावरील मान्यवरांनी सरस्वतीला पुष्पहार अर्पण करून वंदन केले. कार्यक्रमाच्या प्रमुख मनोगतात संस्थेचे विश्वस्त राजेंद्र वाणी यांनी डॉ. रवींद्र ठाकरे यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला. तसेच डॉ. कांतीलाल सोनवणे व डॉ. यशवंत कुलकर्णी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेकडून व महाविद्यालयाकडून डॉ. रवींद्र ठाकरे यांचा शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन डॉ रवींद्र ठाकरे व सौ मीनाक्षी रवींद्र ठाकरे यांचा उचित असा गौरव करण्यात आला. या गौरवानंतर डॉ. ठाकरे यांनी आपल्या मनोगतातून संस्थेने दिलेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आदरणीय अध्यक्ष ॲड. शरदचंद्र शाह यांनी जीवनात संस्थेने उभी केलेली माणसं कधीच डगमगू शकत नाहीत. संस्थेचा हा आदर्श शब्दातीत आहे. संस्थेतील विश्वस्तांनी कर्मचारी वर्गावर टाकलेला विश्वास यामुळे संस्थेचे उपकार आपण आजन्म विसरू शकत नाही. असे विचार त्यांनी मांडले कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव यांनी केले. आपल्या प्रास्तविकातून डॉ. रवींद्र ठाकरे यांच्या कार्यकाळाचा मागोवा मांडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगत आतून बारीक पगारे म्हणाले की निवृत्ती नंतरचे जीवन आनंददायी व सुख संपन्नतेचे असावे यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रवीण मोरे यांनी केले कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर वृंद विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# २५ व्या वर्धापनदिनानिमित्त कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा विक्रोळी- घाटकोपरतर्फे भव्य मिरवणूक,सामाजिक मेळावा

## दिनदर्शिका-२०२५ प्रकाशन सोहळा थाटामाटात संपन्न

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---



कुणबी समाजोन्नती संघ मुंबई (रजि.) शाखा विक्रोळी-घाटकोपरतर्फे शाखेच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त भव्य मिरवणूक, सामाजिक मेळावा, दिनदर्शिका-२०२५ चे प्रकाशन सोहळा विक्रोळी पार्क साईट शिवाजी मैदान,विक्रोळी (प.)मुंबई -७९ येथे बळीराज सेना राष्ट्रीय अध्यक्ष अशोकदादा वालम, कुणबी मध्यवर्ती संघ सरचिटणीस कृष्णा वणे,कुणबी युवा अध्यक्ष तथा संघ सहसचिव माधव कांबळे यांच्या हस्ते पार पडला. रविवार दि.२९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३-३० वा.राम नगर शिवसेना शाखा क्रमांक १२७ येथून मिरवणूक सुरु होऊन ती अमृत नगर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्यात आला.महिला लेझीम, खालू बाजा,अनेक वाद्यवृंद संच, आणि विविध महापुरुष, शेतकरी, संत यांच्या भूमिका सादरीकरण करत पुढे बँक ऑफ इंडीया मार्गे सुजाता हॉटेल आशिर्वाद सोसायटी जवळून संदेश विद्यालय ते विद्यादीप शाळेकडून खाली साईबाबा मंदीर असे करून श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे समारोप साठी सायंकाळी ६-३० वा पोहचली.या कार्यक्रमाला शाखा अध्यक्ष तथा ईशान्य मुंबई उपाध्यक्ष बळीराज सेनाचे सोनू शिवगण, शाखा सचिव तथा सचिव विधानसभा घाटकोपर बळीराज सेना सचिन शिवगण, शाखा खजिनदार उपसचिव विधानसभा घाटकोपर बळीराज सेना चंद्रकांत भोज, शाखा संस्थापक तथा घाटकोपर विधानसभा अध्यक्ष बळीराज सेना आत्माराम बाईत, महिला शाखा अध्यक्षा अश्वीणी बाईत, महिला शाखा सचिव अपर्णा जागडे, प्रमुख पाहुणे म्हणून बळीराज सेना राष्ट्रीय अध्यक्ष अशोकदादा वालम, कुणबी मध्यवर्ती संघ सरचिटणीस कृष्णा वणे,कुणबी युवा अध्यक्ष तथा संघ सहसचिव माधव कांबळे,वासुदेव साळवी-बळीराज सेना सिंधुदुर्ग प्रमुख, सौ.गोंधळी,शिवसेना (उबाठा)चे संजय भालेराव, शिवसेना (शिंदे )डॉ. सुभोध भावधाणे, कॉंग्रेसचे राम गोविंद यादव आणि सर्व बळीराज सेना पदाधिकारी महिला पदाधिकारी सर्व कुणबी समाजोन्नती संघ संलग्न विभागिय शाखा पदाधिकारी, सदस्य, युवक मंडळ पदाधिकारी, सदस्य, विवाह मंडळ पदाधिकारी, सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित करून महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात केली.कार्यक्रम सुत्रसंचालन सचिन शिवगण, चंद्रकांत भोज यांनी केले तर प्रस्तावना सत्यवान शिंदे( बळीराज सेना सिंधुदूर्ग उपाध्यक्ष घाटकोपर विधानसभा उपाध्यक्ष)यांनी केली यावेळी प्रकाश वालम, दिलिप कातकर, चंद्रकांत गोवळकर, अमर डीके, सुरेश मांडवकर, रामानंद कणेरी,दिनेश नावले, मनिष वालम,शंकर मेणे, जनार्दन नात्ती, अशोक नात्ती, राजेश बने, अरविंद हरमले, वसंत राऊत, प्रताप काटकर, थोरे, निंबरे,खामकर सर्व कार्यकारीणी पदाधिकारी कार्यकर्ते, सदस्य आणि सभासद, महिला कार्यकर्त्या पदाधिकारी, सदस्य तसेच प्रसिद्धी प्रमुख शांताराम गुडेकर, केतन भोज यांच्यासह कुणबी समाजोन्नती संघ मुंबई या मातृ संस्थेचे पदाधिकारी,युवक मंडळ पदाधिकारी, बळीराज सेना पदाधिकारी, कु.स.संघ शाखा विक्रोळी-घाटकोपर पदाधिकारी, सदस्य, सभासद, महिला मंडळ पदाधिकारी, सदस्य आणि सभासद, आजी -माजी पदाधिकारी,सदस्य, वधू - वर सूचक मंडळ पदाधिकारी, हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते.दरम्यान उपस्थित सर्व मान्यवर यांचा शाल, पुष्प करंडक, सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.सर्व कुणबी समाज बांधव, भगिणी, युवावर्ग सर्वांनी आपला बहुमुल्य वेळ समाज्यासाठी देऊन सहकार्य केल्याबद्दल कु.स. संघ मुंबई विभागीय शाखा विक्रोळी - घाटकोपर पदाधिकारी, सदस्य आणि सभासद यांच्यातर्फे सर्वांचे आभार व्यक्त व्यक्त करून स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

आता वाचकही बनू शकतो रिपोर्टर
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे
आपल्या स्थानिक समस्या आपल्या अडी अडचणी सरकारच्या
दरबारा पर्यंत पोहचविण्याचे एक हक्काचे व्यासपीठ
पत्रास कारण कि.........
आपल्याला ज्या काही समस्या असतील त्या सरकारी कामाच्या
असो किंवा आपल्या परिसरातील असो...
उचला आपला पेन आणि पाठवा आम्हाला कमीत कमी १०० शब्दात आम्ही
त्या सर्व शासन दरबारी पोहोचविण्यासाठी प्रयत्न करू
तर मग वाट कसली पाहता
उचला आपली लेखणी आणि पाठवा खालील नंबर वर ८४४६६७३६७७

# कासलीवाल विद्यालयात नवीन वर्षाचे जल्लोषात स्वागत

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



नांदगाव येथील सौ .क .मा .कासलीवाल माध्यमिक विद्यालयात नवीन वर्षाचे अनोख्या पद्धतीने उत्साहात स्वागत करण्यात आले.यावेळी 'हॅपी न्यू इयर २०२५' विद्यार्थी श्रृंखला तयार करण्यात आली.सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचे स्वागत करताना विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून आला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे, चांगले छंद जोपसावे तसेच १ जानेवारी पासून दैनंदिनी लिहावी असे आवाहन केले. संस्थेचे चेअरमन मा. सुनीलकुमारजी कासलीवाल , तसेच उपाध्यक्ष सुशील कासलीवाल, सचिव विजय चोपडा, प्रशासक प्रकाश गुप्ता , सहसचिव प्रमिलाताई कासलीवाल,विश्वस्त रिखबचंद कासलीवाल, जुगलकिशोर अग्रवाल, महेंद्र चांदिवाल, आनंद कासलीवाल, तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक सर्वश्री शरद पवार, गोरख डफाळ तसेच सर्व शिक्षकांनी देखील नवीन वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# नांदगाव मतदार संघात सौ. अंजूम कांदे यांच्या हस्ते विविध विकास कामाचा शुभांरभं

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



नांदगाव विधानसभा मतदार संघातील अल्पसंख्यांक वस्तीत यापूर्वी कुठलेही विकासकामे झाली नसल्याने या समाजाने आपले कुठलेच काम होत नसल्याचा गैरसमज करून घेतला होता.आणि साहजिकच ही संकल्पना त्या त्या राजकीय नेतृत्वाच्या दुर्लक्षामुळे प्रत्येकाच्या मनात खोल रुजली होती. मात्र याला विद्यमान आ. सुहास कांदे यांनी सर्वधर्म समभाव वृत्ती ठेवत करोडो रुपयांची विकासकामे कामे लोकांनी मागणी न करता ही करून दिलीत. असे प्रतिपादन महिला स्वयंरोजगाराच्या प्रणेत्या सौ. अंजुमताई कांदे यांनी केले.

नांदगाव नगरपरिषद हद्दीत असलेल्या ईदगाह व शादीखाना साठी आ. सुहास कांदे यांनी अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास अनुदान अंतर्गत योजनेतून सुमारे ५० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून आणला.या कामाचे भूमिपूजन सौ. कांदे यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. आमदार म्हणून निवड झाल्यानंतर आमदार सुहास कांदे यांनी कामाला सुरुवात ही केली आहे. दुसऱ्यांदा आमदार झाल्यानंतरच्या मतदार संघातील पहिल्या विकासकामाचे भूमिपूजन झाले. या ठिकाणी करोडो रुपयांचा निधी खर्चून ईदगाह, व शादीखाना यापूर्वीच आ. कांदे यांनी बांधून दिले आहेत.तसेच या मतदार संघात यापूर्वी कधीच धार्मिक तेढ नव्हती. आणि भविष्यात ही ती होणार नाही. असा विश्वास सौ. अंजुमताई कांदे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी नांदगाव नगरपरिषद चे मुख्याधिकारी श्यामकांत जाधव, राहुल कुटे, शिवसेना महिला आघाडीच्या उज्वला खाडे, विद्या जगताप,अँड.विद्या कसबे, रोहिणी मोरे, पूजा छाजेड, नेहा कोळगे, भारती बागोरे, सोनिया सोर, नजमा मिर्झा, याकूब शेख, मुज्जू शेख, योगिता बच्छाव आदीसह या परिसरातील शेकडो महिला, पुरुष व रहेनुमा फाउंडेशन चे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक अय्याज शेख यांनी तर सूत्रसंचालन सुनील जाधव यांनी केले.

# शिवरायांच्या चरित्राचा अभ्यास केल्यास जीवन समृद्ध होईल- डॉ. निलेश चव्हाण

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

आज जीवनात सुख, आनंद आदी मिळविण्याचे साधन बदलले मात्र शॉर्टकट सुखाच्या नादात आपण आपला आत्मविश्वास, स्वाभिमान, शौर्य आणि जिद्द याला विसरून सोशल मीडियाच्या मायाजालात अडकून पडले असल्याने त्यातून बाहेर पडून शिवचरित्राचे धडे गिरवावेत व समृद्ध जीवन करण्याचे आवाहन शिवचरित्राचे अभ्यासक कवी डॉ. निलेश चव्हाण यांनी केले.

थोर स्वातंत्र्यसैनिक गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी तथा बाबा यांच्या १५ व्या स्मृतिदिनानिमित्त कळसेश्वर विद्यालय कळस बु येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगी केशव बाबा चौधरी हे होते. संस्थेच्या अध्यक्षा सौ. शैलेजा पोखरकर व्यासपीठावर उपस्थित होत्या.

डॉ. चव्हाण पुढे म्हणाले, विद्यार्थी वर्ग प्रचंड अनुकरणीय असतो , उगीचच एखाद्या चित्रपटाचे गीत गाण्यापेक्षा शिवरायांच्या पराक्रमाचे गीत किंवा पोवाडे गाऊन त्यांच्या आदर्श गुणांचे पालन आपल्या जीवनात करून जीवन आनंदी व सुखी करावे. राजमाता जिजाऊ, राजे शहाजी यांच्यासारखे माता पिता होऊन प्रत्येक घरात शिवबा जन्माला आला अन आदर्श समोर ठेऊन आपण जीवनाची वाटचाल केली तर या देशात कधीच बलात्कार, अत्याचार होणार नाहीत. शिवरायांचे स्वप्न स्वराज्य स्थापन करण्याचे होते. आपल्या प्रत्येक आक्रमणात नवनवीन प्रयोग तंत्र वापरून शत्रुलाही धोबीपछाड करण्याचे कसब त्यांचेकडे होते. अविश्रांतपणे सतत स्वराज्याची घडी बसविण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. माणसे ओळखण्याची हातोटी , आत्मविश्वास, जिद्द, रयतेवरील प्रेम, स्वच्छ चारित्र्य , परधर्माचा आदर आदी त्यांचे गुण आपल्या जीवनात अंगीकारण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

अगस्ती एजुकेशन संस्था गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी या शिक्षकाने स्थापन केली. एक शिक्षक इतक्या सुंदर पध्दतीने संस्था विकसित करू शकतो याचे हे दुर्मीळ उदाहरण आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हे बोध वाक्य घेऊन संस्था स्थापन केलेल्या बाबांनी कर्म करण्यावर अधिक भर देत कधीच फळाची अपेक्षा केली नसल्याने इतक्या वर्षानंतरही संस्था, परिवार , सर्व कर्मचारी मोठ्या उत्साहात त्यांचा हा स्मृतिदिन विचारांचा जागर करून साजरा करत असल्याबद्दल कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात योगी केशव बाबा चौधरी यांनी नाईकवाडी बाबांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रास्तविक भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष सतीश नाईकवाडी यांनी सांगितले की, नायकवाडी बाबा कठोर स्वभावाचे होते, अकोले एजुकेशन संस्था व अगस्ती एजुकेशन संस्था ची स्थापना करून तालुक्यात शिक्षणाची दारे बहुजनासाठी उघडली.

याप्रसंगी कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, कारभारी उगले, सुरेश गडाख, सोन्याबापू वाकचौरे, सरपंच राजेंद्र गवांदे, भाऊसाहेब वाकचौरे, ईश्वर वाकचौरे, अण्णासाहेब ढगे, पत्रकार विजयराव पोखरकर, हेमंत आवारी, भानुदास पोखरकर, सरपंच दीपाली चासकर, संस्थेच्या सर्व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक शिक्षकेतर व सेवानिवृत्त कर्मचारी, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वागत कळसेश्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नंदा बिबवे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सतीश पाचपुते यांनी करून दिला. सूत्रसंचालन हरिष आंबरे यांनी तर आभार पर्यवेक्षक संजय शिंदे यांनी मानले शेवटी पर्यवेक्षक मंगेश खांबेकर यांनी पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

नवीन वर्षाचे मंगलमय स्वागत करूया
दैनिक स्वराज्यदूत दिनदर्शिकेने
अधिक माहितीसाठी संपर्क करा तुमच्या नजीकच्या
प्रतिनिधी किंवा दैनिकाच्या अधिकृत क्रमांक ८४४६६७३६७७ वर

# राळेगणसिद्धी येथील एकनाथ भालेकर व शरद मापारी या शिक्षकांनी केला संसदेचा अभ्यास दौरा

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



संसद भवनाच्या प्रांगणात डॉ. गणेश पोटे, सह संचालक, अर्थ मंत्रालय, भारत सरकार, शिक्षक एकनाथ भालेकर आणि शरद मापारी

देशातील लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी आणि संसदीय कार्यप्रणाली कशी चालते हे समजून घेण्यासाठी राळेगणसिद्धी येथील एकनाथ भालेकर व शरद मापारी या दोन शिक्षकांनी भारतीय संसदेचा नवी दिल्ली येथे जाऊन अभ्यास केला. राळेगणसिद्धीचे सुपुत्र व सध्या नवी दिल्ली येथे भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयात सह संचालक पदावर कार्यरत असलेले डॉ. गणेश पोटे यांच्या विशेष सहकार्यातून व मार्गदर्शनातून या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी त्यांनी संसदेच्या कामकाजाची माहिती, संसदीय प्रक्रिया, विधेयकांचे सादरीकरण आणि चर्चा कशी होती याबाबत माहिती जाणून घेतली. तसेच भारतीय लोकशाही व्यवस्थेतील संसदचे महत्त्व व इतिहास, लोकसभा आणि राज्यसभा ही दोन्ही सभागृहे, संसदीय ग्रंथालय, सेंट्रल हॉल, जुने संसद भवन आणि संसद संग्रहालय यांना भेट देऊन ऐतिहासिक दस्तऐवजांचा अभ्यास केला. संसदेतील मार्गदर्शकांनी त्यांना कायदे कसे तयार होतात, संसदेतील प्रश्नोत्तरांचा तास आणि समित्यांचे कार्य याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व पंतप्रधान कार्यालयाचे माजी राज्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याशी त्यांना संवाद साधण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांनी राष्ट्रपती भवन, राष्ट्रीय वस्तू संग्राहालय, प्रधानमंत्री संग्रहालय, लाल किल्ला, इंडिया गेट, राष्ट्रीय युद्ध स्मारक, परमवीर मेमोरियल, महाराष्ट्र सदन, राजघाट, शक्तिस्थळ, शांतिवन, वीरभूमी, किसान घाट स्मारक, विजय घाट, राष्ट्रीय गांधी संग्रहालय, कुतुब मिनार, लोटस टेम्पल, अक्षरधाम मंदिर, गुरुद्वारा बंगला साहिब, हुमायूं का मकबरा, जामा मज्जिद, दिल्लीतील सरकारी शाळा आदी ठिकाणांना भेट दिली. हा अभ्यास दौरा आमच्यासाठी प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक त्याचबरोबर संसदेच्या कार्यपद्धतीबद्दल आमचे आकलन वाढवणारा होता. दिल्लीतील ऐतिहासिक वारसा, परंपरा आणि आधुनिक भारताच्या प्रगतीचा आढावा घेता आला, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. या अभ्यास दौऱ्यासाठी खासदार निलेश लंके, राष्ट्रपती भवन कार्यालयाचे स्क्वाडन लीडर अंकुर नाईक, संसदीय कार्य राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव धीरज सोनजे, संसद सुरक्षा सहायक कमांडट प्रशांत कारंडे, अक्षय पांगरीकर आदींचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

> संसदेतील कामकाज कसे चालते हे पाहणे आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देणे हा एक प्रेरणादायी अनुभव होता. तसेच हा अभ्यास दौरा म्हणजे केवळ पर्यटन नव्हे, तर ज्ञान, अनुभव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारी एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया ठरली.
> **डॉ. गणेश पोटे, सह संचालक, अर्थ मंत्रालय, भारत सरकार**

> संसदेचा अभ्यास दौरा हा केवळ एक उपक्रम नसून, तो तरुणांना लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेण्यासाठी प्रेरित करणारा होता. अशा प्रकारच्या अभ्यास दौऱ्यांमुळे युवकांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि राष्ट्रभक्तीची भावना निर्माण होते.
> **शरद मापारी, शिक्षक**

> संसदेला भेट देणे हा अनुभव आमच्यासाठी खूप प्रेरणादायी ठरला असून, लोकशाही प्रक्रियेतील सहभाग महत्त्वाचा आहे, याची जाणीव झाली. लोकशाही समजून घेतल्याशिवाय तिचे रक्षण करणे शक्य नाही, असा संदेश या अभ्यास दौऱ्यातून आम्हांला मिळाला.
> **एकनाथ भालेकर, शिक्षक**

# बालविवाह मुक्त जिल्हा करण्यासाठी जनजागृतीवर भर द्या : जिल्हाधिकारी
## बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दल आढावा बैठक संपन्न

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------



जिल्ह्यात बालविवाह होवू नये यासाठी महिला बाल विकास विभाग, युनिसेफ एसबीसी ३ च्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. १८ वर्षाखालील मुला-मुलींचे लग्न लावू नयेत ते केल्यास काय शिक्षा होवू शकते हे सर्वांना माहिती पाहिजे. यासाठी कायदयाची जनजागृती व प्रबोधन करण्यावर भर द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिल्या.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिजीत राऊत यांच्या अध्यक्षतेखाली बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दल आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) प्रशांत थोरात, मनपाचे उपायुक्त अजितपाल सिंघ संधु, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक संतोष शेटकार, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक रामचंद्र पांचगे, डॉ. विद्या झिने, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी एस.डी. पवार, नेहरु युवा केंद्राच्या समन्वयक चंदा रावळकर, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापिठाचे डॉ. अमोल प्रभाकर काळे, युनिसेफ, एसबीसी ३ चे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक विकास कांबळे, जिल्हा समन्वयक मोनाली धुर्वे आदींची उपस्थिती होती. जिल्हयात बालविवाह होवू नये यासाठी नागरिकांपर्यंत कायदेशीर कार्यवाहीबाबतची माहिती पोहचविणे अत्यंत आवश्यक असून या विषयावर जनजागृती व प्रबोधन करावे. तसेच यावर्षी कन्या दिवसाच्या निमित्ताने शपथ व मुलींचे बालविवाह न करणेबाबत पालकांना पत्र लिहून कळविण्याचे उपक्रम राबवावेत असे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी सांगितले. तसेच १८ वर्षाखालील मुला-मुलींचे बाल विवाह होणार नाहीत याबाबत शिक्षकांनी जागृती करण्यावर भर द्यावा असेही त्यांनी सांगितले. जिल्हा महिला बाल विकास विभाग नांदेड युनिसेफ आणि एसबीसी ३ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्हा बालविवाहमुक्त करण्याच्या दृष्टीने मागील ४ महिन्यात केलेल्या कार्यवाहीबाबत व पुढील महिन्यात करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबतचा आढावा यावेळी सादर करण्यात आला. तसेच शाळेतील मुलांसाठी विद्यार्थी सत्र, पालक जागरुकता सत्र कार्यक्रम असे विविध कार्यक्रम मागील कालवधीत घेण्यात आले याबाबत सादरीकरण करण्यात आले.

# ज्येष्ठ व अनुभवी पत्रकारांनी अधिस्विकृतीसाठी अर्ज करावेत
## मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने विश्वस्त किरण नाईक यांचे आवाहन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्यासह ५ पदाधिकारी राज्य अधिस्वीकृती समितीवर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. आम्ही आपणास आवाहन करीत आहोत की, जिल्ह्यात नियमित छापील स्वरूपात प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकात सध्या उपसंपादकासहित कार्यरत असलेल्या सर्व पत्रकारांनी ५० वर्षे पूर्ण आणि पत्रकारितेत २० वर्षे अनुभवाच्या कागदपत्रांसहित विद्यमान संपादकांचे पत्र घेऊन वरिष्ठ पत्रकार या श्रेणीत अधिस्वीकृती पत्रिकेचा अर्ज जिल्हा माहिती कार्यालयात दाखल करावा असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक यांनी केले आहे. किरण नाईक यांनी पुढे असे म्हटले आहे की, वरिष्ठ पत्रकार श्रेणी ही स्वतंत्र आहे, याचा आणि दैनिकाच्या खपानुसार मिळणाऱ्या अधिस्वीकृती पत्रिका कोट्याचा काहीच संबंध नाही. तसेच वरिष्ठ पत्रकार यासाठी अर्ज दाखल करण्यासाठी माहिती कार्यालयात जाऊन अधिस्वीकृतीचा अर्ज घेऊन अर्जाच्या वरील भागात वरिष्ठ पत्रकार (५०/२०) असे लिहावे, आणि अर्ज सादर करावा. जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्ष तसेच जिल्हा/ तालुका कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांनी दैनिकातील अधिकाधिक पत्रकारांना ही माहिती द्यावी असे आवाहन करीत जिल्हास्तरावरील अधिकाधिक पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका मिळावी यासाठी मराठी पत्रकार परिषद प्रयत्न करीत आहे. असेही विश्वस्त किरण नाईक यांनी नमूद केले. काही अडचण अथवा मार्गदर्शन हवे असल्यास, किरण नाईक, विश्वस्त (९८२०७८४५४७) या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# शेती निरोगी तर मानवी आरोग्य निरोगी; आदित्य घोगरे तालुका कृषि अधिकारी,पवनी

राम कावडकर
नागपूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

दिवसेंदिवस बदलते वातावरण भौगोलिक परिस्थिती, ऊन, वारा, पाऊस, अतिवृष्टी कीड - रोग इत्यादी नैसर्गिक बदलांचा परिणाम हा मानवी आरोग्य सजीव सृष्टी आणि महत्त्वाचं म्हणजे आपल्या मातृभूमीवर होत आहे. आणि या बदलांचा एकंदरीत परिणाम आपल्या मातृभूमीवर झाला असून जमिनीचे आरोग्य हे सुदृढ नसून रोगट आहे जमिनीचे आरोग्य बिघडलेली असून आपल्या भूमातेचे आरोग्य बिघडलेली असून आपली भूमाता ही निरोगी नसून रोगी आहे आणि पर्यायाने सजीव सृष्टी सुद्धा निरोगी नसून रोगी आहे आणि याचे एकत्रित कारण म्हणजे वाढती बेसुमार वृक्षतोड रासायनिक खयांचा बेसुमार वापर, कीटकनाशके रासायनिक तणनाशके यांचे अतिवापरामुळे वापरामुळे मातृभूमीचा ऱ्हास झालेला आहे. जमिनीचे संतुलन बिघडलेले असून या मातृभूमीला जिवंत ठेवायचे असेल तर जमिनीला संतुलित आहार त्यामध्ये गांडूळ खत, पालापाचोळा, हिरवळीचे खत,




टाकून जमीन निरोगी कशी राहील याकडे लक्ष देणे हे आपल्या सर्व मानवाचे आद्य कर्तव्य आणि त्याकरिता डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अभियानाच्या माध्यमातून मातृभूमीला वाचवा आणि मानवी आरोग्य जपा या प्रेरणेतून नैसर्गिक शेती मिशन अभियानाची सुरुवात झाली.आसगाव येथील आयोजित प्रशिक्षणा संदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना आदित्य घोगरे तालुका कृषी अधिकारी बोलत होते. डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अभियानाच्या माध्यमातून पवनी तालुक्यात एकूण ५०० हेक्टर क्षेत्रावर नैसर्गिक शेती मिशन अभियान माध्यमातून जनजागृती करण्याचे काम कृषि विभागामार्फत करण्यात येत आहे.मागील वर्षीपासून सुरू करण्यात आले शेतकऱ्यांनी दुसऱ्यावर अवलंबून न राहता नैसर्गिक शेती मिशन अभियानाच्या माध्यमातून बांधावरील प्रयोगशाळा, दहा ड्रम थेरी, च्या माध्यमातून जीवामृत, बिजामृत, दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा इत्यादी नैसर्गिक निष्ठांचे उत्पादन करून शेतकऱ्यांनी स्वावलंबी म्हणून शाश्वत आणि चांगल्या गुणवत्तेचे उत्पादन घ्यावा असे प्रतिपादन तालुका कृषी अधिकारी आदित्य घोगरे प्रशिक्षणासंदर्भात शेतकरी बांधवाना करीत होते.नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून शेतकरी शेतकरी गट आणि गटांतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी या सर्व गोष्टी या अभियानामध्ये अंतर्भूत असून हे अभियान तीन वर्षे सुरू असून या अभियानांतर्गत भंडारा जिल्ह्यामध्ये ४५०० हेक्टर मिळून ९० शेतकरी गट आणि नऊ शेतकरी उत्पादक कंपन्या तयार करून येणारे उत्पादन हे शाश्वत चांगल्या गुणवत्तेचे असून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाचे पॅकेजिंग, ब्रॅण्डिंग, शेतीचे प्रमाणीकरण करून मार्केटिंग करून ग्राहकांना विषमुक्त रसायनमुक्त उत्पन्नाचा पुरवठा करणे आणि शेतीला होणारा उत्पादनासाठी लागणारा खर्च कमी करून पर्यावरणाचा रास कमी करून सजीव सृष्टीला जिवंत ठेवणे मातृभूमीला जिवंत ठेवणे हे मानवाचे आद्य कर्तव्य आहे. सदर गाव पातळी प्रशिक्षणाचे आयोजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, पवनी सतीश वैरागडे यांनी केले तर सदर कार्यक्रमाला मंडळ कृषी अधिकारी दिनेश काटेखाये, कृषी पर्यवेक्षक आनंदजी खोब्रागडे, कृषी सहायक राकेश वंजारी आणि महात्मा फुले नैसर्गिक शेती किसान चौरास शेतकरी गट गटातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रशिक्षणासंदर्भात तज्ञांचे मार्गदर्शन आणि शेतकऱ्यांचे मनोगत उपस्थिततांनी ऐकून घेतले. सदर प्रशिक्षणाचे प्रास्ताविक तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सतिश वैरागडे यांनी तर आभार जीवन फुंडे अध्यक्ष किसान चौरास शेतकरी गट आसगाव यांनी मानले.

# कासारी ते तळवाडे रस्तावरील गंभीर वळणावरील भयंकर मोठे खड्डे

## अपघातातून रस्त्यावर कोणाचे बळी जाण्याची वाट बघताय का प्रशासन ?

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

महाराष्ट्र राज्यातील हा असा एकमेव रस्ता आहे की या रस्त्याच्या फक्त सात किलोमीटर प्रवासासाठी एक तास वेळ खर्ची घालावा लागतो असा हा रस्ता आहे .नांदगाव छ. संभाजीनगर मार्गावरील नांदगाव हद्दीतील कासारी ते वैजापूर हद्दीतील तळवाडे या दरम्यान रस्त्याची अक्षरशः मोठी खड्डे झाली तरी देखील प्रशासन याकडे का दुर्लक्ष करत आहे. दोन वर्षापासून या रस्त्याची अवस्था दयनीय झालेली आहे . या रस्त्यावर अधून मधून होणारे अपघात. बंद पडणारी वाहने यामुळे सात किलोमीटर प्रवासासाठी तब्बल एक तास खर्ची घालावा लागतो आहे. कारचालक आणि दु चाकी चालकांचा तर प्रश्न विचारू नका या मार्गावर ते जाताना त्यांचा केव्हा अपघात होईल आणि केव्हा मरणाला सामोरे जावे लागले सांगतात येत नाही.नांदगाव ते छ. संभाजीनगर हा महत्त्वाचा मार्ग असून, त्यावरील कासारी ते तळवाडा दरम्यानचा सुमारे सात किलोमीटरचा रस्ता अत्यंत खराब स्थितीत आहे. या रस्त्यावरील खड्ड्यांनी प्रवाशांचे हाल अक्षरशः काहिली होत आहेत. या भागात नियमितपणे प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः, कार, दुचाकी, आणि मालवाहतूक करणाऱ्या





अवजड वाहनांसाठी हा मार्ग अतिशय धोकादायक ठरला आहे.

### रस्त्याची सध्याची अवस्था

सदर रस्ता अत्यंत खड्डेमय झाला असून, रस्त्यावरील डांबरीकरण पूर्णतः उखडले आहे. ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे वाहनचालकांना वाहनांच्या स्पीडचा ताळमेळ ठेवणे कठीण झाले आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने रस्त्यावरील खड्ड्यांचे प्रमाण आणि खोलपणा लक्षात येत नाही, ज्यामुळे अपघात होण्याची शक्यता अधिक वाढते. काही ठिकाणी रस्त्यावर उभ्या मालवाहतूक वाहनांमुळे वाहतूक कोंडीही होत आहे.

### वाहतूक समस्यांचा आढावा

कार चालकांचे हाल:

रस्त्याच्या खड्ड्यांमुळे कार चालवणे अत्यंत आव्हानात्मक झाले आहे. खड्ड्यांमध्ये गाडी अडकणे, टायर खराब होणे, किंवा गाडीच्या खालच्या भागाला नुकसान होणे, यांसारख्या समस्या वारंवार उद्भवत आहेत.

### दुचाकीस्वारांची कसरत:

दुचाकीस्वारांना खड्डे चुकवत जाण्यासाठी पर्यायी रस्त्यांचा शोध घ्यावा लागतो. परंतु ते रस्तेही सोयीचे नाहीत, ज्यामुळे प्रवासाची वेळ आणि इंधनाचा खर्च दोन्ही वाढत आहेत.

### मालवाहतूक व अवजड वाहने:

या रस्त्यावरून जाणारी अवजड वाहतूक अधिक धोकादायक ठरत आहे. रस्त्यावरील खराब स्थितीमुळे ट्रक आणि मालवाहतूक करणारी वाहने अनेकदा बंद पडतात, ज्यामुळे इतर वाहनांसाठी मार्ग अडवला जातो.

### प्रवाशांचा त्रास:

रोजंदारीसाठी प्रवास करणारे प्रवासी आणि विद्यार्थी यांना हा मार्ग वापरणे अशक्यप्राय झाले आहे. खड्ड्यांमुळे प्रवासाचा वेळ लांबतो आणि शरीराला त्रास होतो.

### अपघातांची वाढती संख्या

रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. दुचाकीस्वारांच्या घसरून पडण्याच्या घटना तर नित्याच्याच झाल्या आहेत. अंधाऱ्या वेळेत खड्डे चुकवणे अवघड होऊन गंभीर अपघात होण्याची शक्यता अधिक आहे.

### सरकारी दुर्लक्ष आणि उपाययोजना

सदर रस्त्याची डागडुजी करण्याच्या मागण्या अनेकदा स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे मांडल्या आहेत. मात्र, अद्याप त्यावर काही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत.

### उपाययोजना:

### तत्काळ डांबरीकरण:

या रस्त्याचे डांबरीकरण जलद गतीने पूर्ण करणे आवश्यक आहे.

### पायाभूत सुधारणा:

रस्त्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी योग्य प्रकारचे बांधकाम साहित्य वापरणे गरजेचे आहे.

### वाहतूक नियमन:

जड वाहतूकसाठी पर्यायी मार्ग निश्चित केल्यास रस्त्यावरील ताण कमी होईल.

### निष्कर्ष

कासारी ते तळवाडा रस्त्याची दुरवस्था ही स्थानिकांसाठी एक गंभीर समस्या बनली आहे. योग्य वेळेत उपाययोजना न केल्यास नागरिकांच्या जीविताला व मालमत्तेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून रस्त्याचे योग्य प्रकारे पुनरुज्जीवन करावे, अशी स्थानिकांची अपेक्षा आहे.

# सकाळ एनआयईच्या राज्यस्तरीय स्पर्धेत प्रा.संतोष क्षीरसागर यांचा लेख ठरला अव्वल

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

श्री भैरवनाथ विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालय पाबळ येथील मराठी विषयाचे शिक्षक प्रा.संतोष क्षीरसागर यांनी सकाळ माध्यम समूहाच्या एनआयई व एम टेक इंजिनियरींग पुणे यांच्यातर्फे 'असा साधला संवाद' या राज्यस्तरीय लेखन स्पर्धेत उच्च माध्यमिक गटात प्रथम क्रमांक मिळवला.पिंपरी चिंचवड मधील ज्ञानप्रबोधनी नवनगर विद्यालयातील मनोहर वाढोकर सभागृहात हा सन्मान सोहळा संपन्न झाला.या सन्मान सोहळ्यासाठी पुणे पिंपरी चिंचवडसह सातारा, अहिल्यानगर, बारामती, नागपूर, अमरावती, बुलढाणा,



सोलापूर, पंढरपूर, पालघर,नवी मुंबई, सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, ठाणे, छत्रपती संभाजीनगर यांसह महाराष्ट्रातील विजेत्या शिक्षकांना स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले.एम टेक इंजिनियरचे सरव्यवस्थापक नदीम शेख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन अधिकारी संगीता बांगर/ घोडेकर, सकाळच्या पिंपरी चिंचवड आवृत्तीचे सहयोगी संपादक जयंत जाधव, ज्ञानप्रबोधनी नवनगर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या उदास, परीक्षक प्रा.शिवराज पिपुंडे, वरिष्ठ बातमीदार पितांबर लोहार, यांच्या हस्ते हे पारितोषिक वितरण करण्यात आले.प्रा.संतोष क्षीरसागर हे भैरवनाथ विद्यामंदिर येथे मराठी विषयाचे शिक्षक असून ते शिरूर तालुका कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे सरचिटणीस आहेत.विद्यालयाचे प्राचार्य अविनाश क्षीरसागर,उपप्राचार्य सुदाम पिंगळे, पर्यवेक्षक तुकाराम ताम्हाणे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे ग्रामीणचे उपाध्यक्ष प्रा जितेंद्रकुमार थिटे, एकनाथराव बगाटे, निळकंठ पाटील, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे संदीप गवारी, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे ग्रामीणचे शिरूर तालुका उपाध्यक्ष मच्छिंद्र खेडकर, भैरवनाथ सेवक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष कुमारआबा चौधरी, शिरूर तालुका कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या अध्यक्षा प्रा.निर्मला संकपाळ, भैरवनाथ सेवक सहकारी पतसंस्थेचे सचिव राहुल गायकवाड यांनी अभिनंदन केले.

# शपवार सि. एस. यांना आदर्श समाज भूषण गौरव पुरस्कार

सौरभ कामडी
मोखाडा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

वाकडपाडा वस्तीगृहाचे अधिक्षक व महाराष्ट्र राज्य अनुदानित वस्तीगृह संघटनेचे पदाधिकारी असलेल्या श्री चुनीलाल पवार सर यांना दुर्गा सोशल फाउंडेशन चा राष्ट्रीय फिनिक्स गोल्बल अवार्ड (आदर्श समाज भूषण गौरव पुरस्कार)या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे .

हा पुरस्कार सोहळा कोल्हापूर



येथे पार पडला, सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असुन महाराष्ट्र राज्यातील उल्लेखनिय सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. पवार सर यांनी वस्तीगृह संघटनेच्या माध्यमातून राज्य भरातील वस्ती गृह कर्मचारी बांधवाचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे बहुमुल्य काम गेली अनेक वर्षे केले आहे.कर्मचार्यांना वेतनासाठी त्यांनी दिलेला लढा, वस्ती गृहातील सुधारणा,राज्य भरातील वस्ती गृह कर्मचारी संघटना बांधणी असे मोलाचे कार्य चुनीलाल पवार यांनी केले आहे.

यावेळी पवार यांनी सांगितले की मी केलेल्या कामाची दखल दुर्गा फाऊंडेशन ने घेतली असुन हा पुरस्कार माझ्या सर्व कर्मचारी संघटनेच्या एकीला आहे.भविष्यात अधिक काम करण्याची उर्जा या पुरस्कारा मुळे मिळेल असे हि पवार यांनी सांगितले.

# महाराष्ट्र एस.टी.वर्कर्स कॉंग्रेस (इंटक) संघटना कामगारांना न्याय देण्यासाठी सज्ज

## इंटक संघटनेचा धुळे विभागीय कामगार संवाद मेळावा साक्रीत संपन्न साक्रि आगारात महाराष्ट्र एस टि वर्कर्स कॉंग्रेस इंटकच्या फलकाचे अनावरण

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

कामगार संघटना व इतर संघटनांमधील सुमारे २०० कर्मचाऱ्यांचा इंटक संघटनेत प्रवेश.. दि.२९/१२/२०२४ (रविवार) रोजी महाराष्ट्र एस.टी.वर्कर्स कॉंग्रेस (इंटक) संघटनेचा धुळे विभागीय कामगार संवाद मेळावा साक्री येथे शासकीय विश्रामगृहात पार पडला, या मेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र एसटी वर्कर्स कॉंग्रेस इंटक संघटनेचे सरचिटणीस .मुकेशभाऊ तिगोटे संघटनेचे राज्य उपाध्यक्ष मा.राजेंद्र घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

इंटक (जनरल) चे धुळे जिल्हाध्यक्ष श्री.प्रमोद शिसोदे , एस.टी.इंटकचे विभागीय अध्यक्ष श्री.विकास गवळी , विभा.सचिव श्री.चंद्रकांत गोसावी, राज्य कार्यकारिणी सदस्य सुनील पाटिल, किशोर अप्पा पाटिल,शरद शिंदे यांचे सह श्री.अनिल पाटील, श्री.आबा ठोसर , श्री.देसले आबा , दै.स्वराज्यदुतचे श्री.संजय बच्छाव दै.लोकमतचे श्री विद्यानंद पाटिल यांचीही उपस्थिती मेळाव्याला लाभली. मेळाव्यात .मुकेश तिगोटे यांनी



संघटनेच्या कामकाजासह माहिती घेत संघटनेच्या वतीने आगामी काळात संघटनेचे ध्येयधोरणे राबविण्यासाठी मार्गदर्शन केले. एस टि कामगारांना शासकिय कामगांराप्रमाणे वेतन श्रेणी व वेतन मिळाले पाहिजे प्रलंबीत वेतन करार सन २०१६ ते २०२० झाला पाहिजे, सन २०२० ते २०२४ वेतन कराची थकबाकी एकरकमी मिळाली पाहिजे सन २०१६ ते २०२४ पर्यंन्तची विविध भत्याची थकबाकि मिळाली पाहिजे या मेळाव्यात मा.मुकेश तीगोटे यांच्या नेतृत्वावर तसेच संघटनेच्या ध्येयधोरणांवर विश्वास व्यक्त करत एसटी कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र एसटी वर्कर्स कॉंग्रेस इंटक संघटनेत प्रवेश केला, यात शिरपुर आगारातील एसटी कष्टकरी जनसंघाचे श्री.प्रविण चौधरी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण कार्यकारिणी तसेच श्री.गणेश पाटील, श्री.हरिष वंजारी, श्री.अमोल वारुडे, श्री. हेमंत पाटील .एस.के.सनेर नंदुरबार आगारातील एसटी कष्टकरी जनसंघाच्या श्री. रवींद्र बैरागी, श्री.संजय पाटील, श्री.अनिल पाटील, श्री.प्रमोद महाजन, सलीम मलिक, श्री.भास्कर पाटील, श्री.आबा पाटील, श्री.गुलाब पाटील नवापूर आगारातून एसटी कष्टकरी जनसंघाचे श्री.विलास गावित यांच्या सोबत श्री.शामराव गावित, श्री.चौरे, श्री.ए.एस.मावची, श्री.दिवानजी गावित , श्री.एम.एस.सपकाळ, श्री.अंकुश गावित, श्री.जगताप श्री.निलेश गावित, श्री.विजय गावित. श्री.संदीप गावित, श्री.यशवंत गावित, श्री.रोहिदास कुवर यांचेसह सुमारे ५० सभासद.तसेच साक्री आगारातील कामगार सघंटनेतुन श्री.जगदिश ठाकरे , श्री.नितीन सामुद्रे, श्री.तात्या भाऊ सोनवणे, श्री.शशीकांत जिरे, श्री.अनिल भदाणे, श्री.दिनेश पाटिल, श्री.बबलू आहिरे कामगार सेनेतुन श्री.विठोबा बेडसे,श्री.योगेश देवरे, श्री.सुरेश बुवा अशा सुमारे २०० कर्मचाऱ्यांनी इंटक संघटनेत प्रवेश केला.मेळाव्याचे प्रास्ताविक श्री.चंद्रकांत गोसावी तर सुत्रसंचलन श्री.दिनेश नेरकर यांनी केले. आभार अनिल चव्हाण यांनी केले मेळाव्याचे यशस्वीतेसाठी साक्री आगाराचे श्री वैभव सोनवणे श्री.संदिप पवार, श्री.प्रकाश शिंदे, श्री.खलील पिंजारी, श्री.नाजीम पिजांरा, श्री.सुनील पाटिल कौशल पवार , हिंमत सोनवणे, योगेश खैरनार ,शशीकांत जिरे, ज्ञानेश्वर चौधरी अमोल देवरे , विठोबा बेडसे, यांचेसह साक्री आगारातील सर्व इंटक कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.. तसेच दैनिक स्वराज्यदूत श्री संजय बच्छाव व दैनिक लोकमतचे पत्रकार श्री विद्यानंद पाटील यांनी एसटी कामगारांचे प्रश्न वेळोवेळी शासन प्रशासन दरबारी आपल्या लेखणीतून प्रखरपणे मांडले आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केला त्याची कृतज्ञता म्हणून महाराष्ट्र एसटी वर्क्स कॉंग्रेस इंटकचे सरचिटणीस मा.श्री मुकेश जी तिगोटे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व श्री छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.